**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालयात**
**गुन्ह्याचा तपशील**

**सं.फौ.ख.नं. ५७७/२०२६ (गु.र.क्र. ५०/२०२६)** **निशाणी क्र.०२**

**आर.पी.एफ. भिगवण विरुध्द अजरोद्दीन अहमद शेख,**

१. अपराध घडल्याची तारीख **: २८.०२.२०२६**

२. अहवालाचा/फिर्यादिची तारीख **: ०७.०३.२०२६**

३. फिर्यादीचे नांवः **: निरीक्षक**
**आर.पी.एफ. भिगवण, जि पुणे**

४. आरोपीचे नांवः **: अजरोद्दीन अहमद शेख,**
**वयः २७ वर्षे, धंदा- वाहनचालक**
**पत्ताः गरीबी हटाओ झोपडपट्टी नं. ०२, उत्कर्ष नगर,**
**विजापुर रोड, सोलापुर.**

५. गुन्ह्याचा तपशील -

तुम्ही दिनांक २८.०२.२०२६ रोजी ०७.३४ ते ०७.३९ वाजताच्या दरम्यान भिगवण ते मलठण रेल्वे स्टेशन दरम्यान गाडी क्र. १६५८७ रेल्वेमध्ये वैध कारणाशिवाय अलार्म चैन ओढल्यामुळे भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न क्र.१: तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.२: तुम्हाला आता आरोप वाचुन दाखविला व समजावुन सांगितला तो समजला काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.३: तुम्हाला गुन्हा कबुल आहे ?

उत्तरः होय, स्वतःच्या इच्छेने गुन्हा कबुल करीत आहे.

स्थळः दौंड.
दिनांकः ०७.०३.२०२६.

समक्ष,

A.Shaikh
-------------
आरोपीची सही

7/3/26
प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## **<u>कारणमिमांसा</u>**

आरोपीला त्याच्यावर असलेला दोषारोप वाचुन दाखविले असता, त्याने गुन्हा स्वेच्छेने कबुल केला आहे. शिक्षेबाबत आरोपीला विचारले असता, त्याने असे निवेदन केले की, तो गरीब असुन कुटुंबातील एकमेव कमवता व्यक्ती असुन कुटूंबाची पालनपोषणाची जबाबदारी आरोपीवर आहे. त्यामुळे, शिक्षा देताना कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केल्यावरुन असे स्पष्ट होते की, त्याला त्याच्या कृतीबाबत पश्चाताप होत आहे. आरोपीचे वय, गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल या तथ्यविषयक व विधिविषयक निष्कर्षास मी येत आहेः

## **<u>आदेश</u>**

१. आरोपी नामे **अजरोद्दीन अहमद शेख** यास भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४१ अन्वये शिक्षापात्र असणाऱ्या गुन्ह्यांसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी धरण्यात येते व आरोपीला रक्कम रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येते. आरोपीने उपरोक्त द्रव्यदंडाची रक्कम भरण्यास कसुर केल्यास आरोपीस पाच दिवसाची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

7/3/26.

स्थळः दौंड,
दिनांकः ०७.०३.२०२६.

प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

केस नं. 577/2026
दंड रक्कम रु. 1000/-
पावती नं. 3596 ने जमा

सहा. अधीक्षक
लोहमार्ग न्यायालय, दौंड